Jagdamba Education Society's
SND POLYTECHNIC
KNOWLEDGE PERSPECTIVE UNDERSTNING

Jagdamba Education Society's

# Santosh N. Darade Polytechnic

At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

Accredited by NBA NATIONAL BOARD OF ACCREDITATION

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing…

**Date: 04/09/2025**

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

आपल्या वाचन्या, आवल्या वाचन्या...
आपलं महानगर My महानगर.com
www.mymahanagar.com

# दिनविशेष

## व्यासंगी साहित्यिक, समीक्षक शंकर सारडा



शंकर सारडा हे साहित्यिक आणि समीक्षक होते. त्यांचा जन्म महाबळेश्वर येथे ४ सप्टेंबर १९३७ रोजी झाला. दीर्घकाळ साहित्याच्या, समीक्षेच्या क्षेत्रात घालवल्यावर व पत्रकारिता केल्यावरही त्यांचा 'स्नेहशील' या शब्दाने गौरव होत असे. असे भाग्य फारच थोड्या लोकांना लाभते. सन १९६८ च्या सुमारास सारडा हे 'साधना'चे अतिथी संपादक होते, तेव्हा त्यांच्या काळात त्यांनी ह.मो. मराठे यांची 'निष्पर्ण वृक्षाखाली' ही कादंबरी प्रकाशित केली. भा.रा. भागवत यांच्या 'फास्टर फेणे'च्या निर्मितीमागे शंकर सारडा यांची प्रेरणा होती. प्रत्येक साहित्य संमेलनाला हजेरी लावून त्याचे वृत्तांकन करणारा सारडांसारखा पत्रकार विरळाच. बालसाहित्यिक असल्याने, त्यातून झिरपणारी स्नेहाळ वृत्ती त्यांच्यात होती. इंग्रजी साहित्याचे अभ्यासक अनेकदा देशी साहित्याकडे तुच्छतेने पाहतात, परंतु सारडा यांच्यात ती भावना नव्हती.

शंकर सारडा यांनी विविध विभागीय संमेलने भरवण्यात जो पुढाकार घेतला, ती साहित्यप्रसारकाची भूमिका ही त्यांची मूळ वृत्ती होती. समीक्षणांना त्यांनी प्रतिष्ठा मिळवून दिली. लेखक म्हणून त्यांनी १९५० पासून सातत्याने बालसाहित्य लिहिले. शंकर सारडा यांचे पहिले पुस्तक संस्कृत पंडित आणि लेखक वि.कृ. श्रोत्रिय यांच्या मार्गदर्शनामुळे प्रकाशित झाले. सारडा हे पत्रकार, समीक्षक आणि बालसाहित्यकार म्हणून प्रसिद्ध होते. किशोरवयापासूनच त्यांचे लेखन आनंद, बालमित्र, साधना, मुलांचे मासिक यांसारख्या अंकांमधून प्रसिद्ध व्हायला सुरुवात झाली होती. सारडा यांनी ६०हून अधिक पुस्तके लिहिली असून, दोन हजारांहून जास्त पुस्तकांचे समीक्षण केले आहे. टॉलस्टॉय, गिबन यांसारख्या प्रख्यात लेखकांच्या कादंबऱ्यांचा त्यांनी अनुवाद केला आहे. शंकर सारडा यांचे पुणे येथे २८ जानेवारी २०२१ रोजी निधन झाले.

Nashik Edition
Sep 04, 2025 Page No. 4
Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401